# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:11.12.2025** **वारः गुरुवार**

1. महिलांचं सक्षमीकरण मानवी अधिकाराचा मुख्य स्तंभ असल्याच राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन
2. राज्यातील इलेक्ट्रीक वाहनांना पथकरमाफी देण्याबाबत आठ दिवसात कार्यवाहीचे निर्देश
3. दिवाळी सणाचा युनेस्कोच्या अमूर्त वारसा यादीमध्ये समावेश आणि
4. भारत-दक्षिण आफ्रिका दरम्यान आज वीस षटकांचा दुसरा सामना

**<u>मानवी हक्क दिन</u>**

महिला सक्षमीकरण हा मानवी अधिकाराचा मुख्य स्तंभ आहे असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. जागतिक मानवाधिकार दिनानिमित्त नवी दिल्लीत भारत मंडपम इथं राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या वतीनं काल आयोजित मुख्य समारंभात त्या बोलत होत्या. मानवाधिकारामुळे लोकशाहीला बळ मिळतं असं त्या म्हणाल्या 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' या अंतर्गत मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य मिळालं तसच सरकारच्या विविध योजनांमुळं महिलांची आर्थिक भागीदारी, आत्मनिर्भरता आणि सन्मानाला बळकटी मिळत असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

**<u>विधानसभा-विधान परिषद तुळापूर–वढू</u>**

राज्यातील इलेक्ट्रीक वाहनांना पथकर माफी देण्याबाबत पुढील आठ दिवसांत कार्यवाही करण्याचे निर्देश दिले असून या निर्णयाच्या अंमलबजावणीपासून आजपर्यंतच्या काळात पथकर घेतला गेला असल्यास पुरावा सादर केल्यावर नागरिकांना त्याचा परतावा द्यावा, असे आदेश विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी काल दिले. या संदर्भात काढलेल्या शासन निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याची बाब सदस्य अनिल पाटील यांनी विधानसभेत मांडल्यानंतर नार्वेकर यांनी हे निर्देश दिले.

पुणे जिल्ह्यातील छत्रपती संभाजी महाराज यांचं बलिदान स्थळ तुळापूर आणि समाधीस्थळ वढू-बुद्रुक यांना जोडणाऱ्या रस्ता आणि पुलाच्या कामाला मान्यता देण्यात आली आहे. या संदर्भात काल नागपूर इथं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या परीसरातील विकासाला गती देण्यासाठी 5 शे 35 कोटी 50 लाख रुपयांच्या सुधारित आराखड्यास शिखर समितीची मंजुरी मिळाली आहे.

पुणे शहरातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी स्वारगेट, शनिवारवाडा या ठिकाणी तीन मार्गिकांचे दोन भुयारी मार्ग तयार करण्याचं काम पुणे महानगरपालिका किंवा सार्वजनिक बांधकाम विभाग यापैकी कोणी करावं, यासंदर्भात मुख्यमंत्री निर्णायक बैठक घेणार असल्याची माहिती मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत दिली. विधानसभा सदस्य हेमंत रासने यांनी यासंदर्भात लक्षवेधी सूचनेद्वारे विचारणा केली होती.

मुंबई आणि परिसरात वाहतूक नियोजन आणि इ-चालानबाबत धोरण ठरविण्यासाठीअभ्यासगट स्थापन करण्यात येणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधान परिषदेत जाहीर केले. या संदर्भात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले...........

**निश्चितपणे आपण ही एम्नेस्टी ची स्कीम आणून जुने जे चालान आहेत त्या चालानमध्ये त्यांनी एक विवक्षित पन्नास टक्के जी काही रक्कम असेल ती भरावी आणि उरलेली आपण त्या ठिकाणी माफ करू अशा प्रकारची एम्नेस्टी आपण आणू. आणि कॉन्करंट पद्धतीत मात्र आपल्याला ते वसुलीची वेगळी व्यवस्था उभं करणं त्यात त्यांनी जी सूचना दिल्या आहेत त्याचाही**

**विचार निश्चितपणे करता येईल की फास्ट टॅग मधनं तिची वसुली ऑटोमॅटिक होणं हे देखील आपण त्या दृष्टीने करण्याचा प्रयत्न करू.**
**तंत्रज्ञानाचा उपयोग करून ट्रॅकिंग हो, आणि त्या व्यक्तीला हार्डशिप होणं या संदर्भात वेगवेगळ्या देशातल्या प्रॅक्टिस किंवा राज्यातल्या प्रॅक्टिसस याचा अभ्यास आम्ही करू. मी आजच याची घोषणा करतो की एका वरिष्ठ अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली एक अभ्यास गट तयार करून या वसुलीच्या संदर्भात टेक्नॉलॉजी आणि हार्डशिप या दोन्हींचा अभ्यास करून पुढच्या तीन महिन्यामध्ये आम्ही एक पॉलिसी आणू.**

तर वाहतूक हवालदार खासगी मोबाईलवरून फोटो काढून इ-चलान देत असल्याबाबत राज्यमंत्री योगेश कदम यांनी हवालदारांना यासाठी कॅमेरा देण्याबाबत विचार सुरू असल्याचे सांगितलं.

ओबीसी समाजासाठी महामंडळ आणि उप कंपन्यांच्या माध्यमातून व्याज पर्तव्याच्या ज्या योजना राबवल्या जातात त्या योग्य पद्धतीने राबवून त्यासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही अशी ग्वाही देताना फडणवीस म्हणाले.........

**योजना तयार झाल्या आहेत. त्याचा जे माध्यम आहेत उपकरण आहे ते तयार झालेलं आहे. भविष्यामध्ये मी या सभागृहाला आश्वस्त करू इच्छितो की जसं आम्ही अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाला कधीही व्याज परताव्यात कमतरता पडू दिली नाही. एकही वर्षी नाही. जेवढे पैसे, तेवढे वेळेवर भरले. तसेच या जेवढ्या ओबीसी च्या उपकंपन्या आहेत जेवढी महामंडळ आहेत. याकरता ज्या काही व्याज परताव्याच्या योजना आहेत या योजना नीट राबवून जेवढा त्याच्याकरता खर्च येईल तो सगळा व्याजाचा परतावा राज्याच्या आपल्या बजेट मधनं आम्ही तो देऊ.**

**जमीन-महसूल**

राज्यातील जमीन महसूल प्रक्रियेत सुलभता आणण्यासाठी अकृषिक परवानगीची अट रद्द केल्यानंतर आता त्यापुढील 'सनद' घेण्याची अटही रद्द करण्यात आली आहे. संदर्भातील 'महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक' महसूलमंत्री चंद्रशेखर बानकुळे यांनी काल विधानसभेत मांडलं. 1966 च्या जमीन महसूल संहितेमध्ये 2014 ते 2018 दरम्यान सुधारणा करून रहिवासी आणि वाणिज्यिक वापरासाठी 'एन.ए.' म्हणजे अकृषिक परवानगीची अट यापूर्वीच शिथिल करण्यात आली होती. मात्र, त्यानंतरही 'सनद' घ्यावी लागत असल्यानं प्रक्रियेत क्लिष्टता होती. आता ही अट पूर्णपणे काढून टाकण्यात आली असून, त्याऐवजी नाममात्र प्रीमियम म्हणजे अधिमूल्य आकारला जाणार आहे.

**मानवी हक्क दिन-रत्नागिरी**

मानवी हक्क दिन प्रत्येक व्यक्तीचा सन्मान, सुरक्षितता आणि जगण्याचा अधिकार अबाधित राखण्याचा दिवस असल्याची एक घटना समोर आली आहे. दोन वर्षापूर्वी सोलापूर जिल्ह्यात बार्शी इथल्या 73 वर्षाच्या विजयाबाई जाधव हरवल्या होत्या. घरापासून, आपल्या माणसांपासून आणि परिचित जगापासून दूरत्या ओडिशा इथं सापडल्या... अनोळखी ठिकाणी आजीचा हा एकाकी अनपेक्षित प्रवास ओडिशाहून सांगली ते परत बार्शीपर्यंत प्रशासनाच्या सहकार्यानं पूर्ण झाला. या सकारात्मक उदाहरणावरून खऱ्या अर्थानं मानवी हक्क दिन साजरा झाला असल्याची भावना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांनी व्यक्त केली........

**आपल्या महाराष्ट्र राज्यातील बार्शी येथील त्र्याहत्तर वर्षाची आजी विजयाबाई रघुनाथ जाधव या दोन वर्षापासून ओडिशा राज्यातील झारसुगुडी जिल्ह्यामध्ये हरवल्या होत्या. सव्वीस नोव्हेंबरला तिथले जिल्हाधिकारी आपले महाराष्ट्राचे कुणाल चव्हाण यांना त्या दिसल्या. त्यांनी माझ्याशी संपर्क साधला आणि नंतर आम्ही त्यांच्यासोबत एक स्टाफ पाठवून तिथल्या एगो सोबत कॉर्डिनेशन करून रेल्वेचं टिकट बुकून आज आजीला आपण इथे आलो. आजी ही डेली कामगार करणारी होती, वीटभट्टीवर काम करत होती. चुकून कोणीतरी त्यांना तिकडे घेऊन गेलं. त्यांच्याकडे कोणतंही आयकार्ड नव्हतं, मोबाईल क्रमांक नव्हता, त्यांच्या घरच्याही संपर्क होऊ शकत नव्हता. आम्ही त्यांचा व्हिडिओ बनवून सामाजिक माध्यम आणि इतर मीडिया चा वापर करून त्यांच्या सहकार्यातून त्यांच्या घराकडून पोहचू शकलो. आणि आज दहा डिसेंबर मानवाधिकार दिवस खरोखर साजरा होईल असं मला वाटतं.**

परभणी जिल्हा कारागृहात मानवी हक्क आणि संरक्षणाबाबत जागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं होतं. रत्नागिरीच्या विशेष कारागृहामध्ये 'कैद्यांचे मानवी हक्क आणि संरक्षण' या विषयावर जनजागृती करणारा कार्यक्रम घेण्यात आला.

**दिवाळी**

भारतातल्या प्रमुख सण असलेल्या दिवाळीचा समावेश युनेस्कोच्या अमूर्त वारसा यादीमध्ये झाला आहे. नवी दिल्लीतल्या लाल किल्ला इथं युनेस्कोच्या अमूर्त सांस्कृतिक वारसाशी संबंधित झालेल्या बैठकीमध्ये दिवाळीचा या यादीमध्ये अधिकृत समावेश करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युनेस्कोचे या निर्णयाचं स्वागत केलं. आपल्या दृष्टीने दीपावलीचा सण संस्कृती आणि जीवन मूल्यांसोबत घट्ट जोडलेला आहे, तो आपल्या संस्कृतीचा गाभा आहे, प्रकाश, सत्य आणि नीतीचे प्रतीक आहे. दीपावलीचा युनेस्कोच्या अमूर्त सांस्कृतिक वारसा यादीमध्ये समावेश झाल्याने याची जागतिक ओळख आता अधिकच झाली असल्याचं पंतप्रधानांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या निर्णयाबद्दल आनंद व्यक्त केला.

**ध्वजदिन-बीड,सोलापूर**

ध्वजनिधी संकलनात बीड जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकावर राहिला आहे. माजी सैनिकांच्या कल्याणार्थ विविध योजना आणि उपक्रम राबविण्यासाठी दरवर्षी 7 डिसेंबर हा 'ध्वजदिन' म्हणून पाळण्यात येतो. तर सोलापूर जिल्हा सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनात विभागात अव्वल राहिला आहे.

**एसटी-मेल**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या 'पॅकेज टूर' उपक्रमाच्या अंतर्गत यावर्षी एप्रिल ते नोव्हेंबर या कालावधीत राज्यभरात 4 हजार 39 पॅकेज सहली यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आल्या. यातून महामंडळाला 19 कोटी रुपये उत्पन्न मिळालं.

**मेफेड्रॉन**

वर्ध्याजवळ करंजा घाडगे इथं बेकायदा मेफेड्रॉन उत्पादन केंद्रावर छापा टाकून 192 कोटी रुपये किंमतीचे 128 किलो अंमली पदार्थ आणि सामग्री जप्तकरण्यात आले. महसूल गुप्तचर संचालनालयानं केलेल्या या कारवाई प्रकरणी तीन जणांना ताब्यात घेण्यात आलं आहे.

**नक्षलवादी**

विविध हिंसक घटनांमध्ये सहभाग असलेल्या 11 नक्षलवाद्यांनी काल पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्यासमोर गडचिरोली इथं शस्त्रं खाली ठेवली. या सर्वांवर एकंदर 82 लाख रुपयांचं बक्षीस होतं.

**क्रिकेट**

भारत आणि दक्षिण आफ्रिका दरम्यान वीस षटकांच्या पाच सामन्यांच्या मालिकेतील दुसरा सामना आज न्यू चंदीगड इथं खेळला जाणार आहे. संध्याकाळी 7 वाजता सामना सुरु होणार आहे. मालिकेतील पहिला सामना जिंकून भारतानं आघाडी घेतली आहे.

**हवामान**

मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात थंडीची लाट कायम आहे. अन्यत्र हवामान कोरडं राहील.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.